# शेवगा

kvkmalegaon@gmail.com www.kvkmalegaon.org



महाराष्ट्रात ८०% पेक्षा हि जास्त क्षेत्र हे कोरड वाहू आहे. यातील बऱ्याचशा जमिनी हलक्या बरड आणि नापीक म्हणून पडून आहेत. अशा जमिनीत शेवग्याची लागवड निश्चितच फायदेशीर ठरेल. कारण शेवगा पावसाच्या पाण्यावर येऊ शकतो.

**हवामान व जमीन :-** शेवगा कोणत्याही हवामानात वाढू शकतो. शेवग्याची लागवड हि अत्यंत हलक्या ते भारी जमिनीत करता येते.

**जाती :-** तामिळनाडू कृषि विश्वविद्यालय, कोईमतूर या संस्थेने कोईमतूर-१, कोईमतूर-२, पि.के.एम-१ आणि पि.के.एम-२ या लवकर शेंगा येणारे आणि भरपूर प्रथिने असलेले वाण प्रसारित केले आहेत. तसेच कोकण कृषि विद्यापीठाने कोकण रुचिरा वाण प्रसारित केलेला आहे. ह्या जातीची झाडे ५ ते ६ मिटर उंच असून झाडास १६ ते २२ फांद्या असतात तसेच बागलकोट (कर्नाटक) येथील विद्यापीठाने भाग्य हि जात चांगल्या उत्पादनासाठी विकसित केली आहे.

**लागवड :-** व्यापारी तत्वावर शेवग्याची लागवड करायची असल्यास पावसाच्या पूर्वी ६० सें.मी. लांब, रुंद आणि खोल खड्डे घ्यावेत. लागवड करतांना दोन झाडांतील व ओळीतील अंतर ३*३ मिटर ठेवावे. शेताच्या बांधावर लागवडीसाठी ३ ते ४ मिटर अंतर ठेवावे. शेवग्याची अभिवृद्धी फाटे कलम व बियांपासून रोपे तयार करून केली जाते. परंतु बियाण्यापासून लागवड केल्यास मातृवृक्षाप्रमाणेच गुणधर्म असलेली झाडे मिळू शकत नाहीत. तसेच बिया लागवडीपासून केलेल्या झाडापासून शेंगा फाटे कलमापेक्षा ३ ते ४ महिने उशिरा मिळतात. फाटे कलमापासून लागवडीसाठी ५ ते ६ सें.मी. जाडीच्या सुमारे १ ते १.२५ मिटर लांबीच्या फांद्या वापरतात.

**लागवडीचा हंगाम :-** कमी पावसाच्या प्रदेशात (खरीपात) जून-जुलै मध्ये पहिल्या पावसानंतर वातावरणात अनुकूल बदल होतो. हवेतील आद्रता वाढते. अशी हवा फाटे कलम फुटण्यास किंवा रोपे रुजण्यास अनुकूल असते. तेव्हा ह्याच वेळी लागवड करावी. फाटे कलम अथवा रोपे लावल्यावर त्याच्या जवळील माती पायाने चांगली दाबावी व खत पाणी द्यावे. लागवडी नंतर ६ ते ८ महिने गरज पडेल तेव्हा पाणी देऊन झाडे जागवावी.

**लागवडीनंतर घ्यावयाची काळजी :-** शेवगा लागवडी नंतर आवश्यक महत्वाच्या बाबी म्हणजे आंतरमशागत, प्रमाणित खतांचा वापर, झाडाची योग्य छाटणी या बाबींची काळजी घेणे आवश्यक आहे. आंतर मशागत कारावि लागत नाहीत. तरी सुद्धा झाडाची आळी खुरपुन स्वच्छ करावीत. तसेच दोन झाडाच्या ओळीत वखरणी करावी. म्हणजे तणाचा उपद्रव होणार नाही. शिवाय पावसाचे पाणी जमिनीत मुरले जाते. शेवग्याला प्रतिवर्षी प्रत्तेक झाडास पावसाच्या सुरवातीस १० किलो शेणखत, ७५ ग्रॅम नत्र (१६५ ग्रॅम उरिया), ५० ग्रॅम स्फुरद (३१२ ग्रॅम सुपर फॉस्फेट) व ७५ ग्रॅम पालाश (१२० ग्रॅम म्यूरेट ऑफ पोटॅश) द्यावे. शेवग्याचे झाड झपाट्याने वाढणारे असल्यामुळे झाडांना आकार देणे आवश्यक आहे. व्यवस्तीत आकार नाही दिला गेला तर झाड उंच वाढते आणि त्यामुळे शेंगा काढणीस अवघड जाते. त्यासाठी लागवडी नंतर पहिली छाटणी ४ महिन्यांनी करावी. या वेळी खोड जमिनी पासून १ मिटर अंतरावर छाटावे आणि ४ दिशांना ४ फांद्या वाढू द्याव्यात. त्यामुळे झाडाची उंची कमी होऊन शेंगा काढणीला सोपे जाते व उत्पन्न वाढते. पुढे जसजसे झाड जुने होईल तसतसे दर दोन वर्षांनी एप्रिल मे महिन्यात शेंगा निघाल्यावर छाटणी करावी म्हणजे झाड नियमित उत्पन्न देईल.

**काढणी व उत्पन्न :-** लागवडी पासून सुमारे ८ ते १० महिन्यांनी शेंगा मिळू लागतात. पूर्ण वाढीच्या आणि ज्यांचा पीळ पूर्ण उलगडला आहे अशा शेंगा लांबी नुसार जुळवून घ्याव्यात प्लास्टिक कागद गोणपाटावर गुंडाळल्यास शेंगाचा तजेला ज्यास्त काळ टिकून राहतो. एक वर्षा नंतर दर वर्षी एक चांगल्या झाडापासून सुमारे २५ ते ५० किलो शेंगा मिळतात.